policyresearch.in
contact@policyresearch.in
+91 8007971692/ +91 9823431138
@policyresearch.in
@policy.research
@PRO_thinktank

Policy Research Organization
Reg.no: E- 8916/ Pune

६ मे २०२६

**- प्रसिद्धीसाठी –**

## पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सोप्या सुटसुटीत रूपात

पुणे महानगरपालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी एप्रिलपासून सुरू झाली आहे. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर PDF स्वरूपातला अर्थसंकल्प असला तरी तो सामान्य नागरिकांनाच काय, पण सामाजिक-राजकीय कार्यकर्ते आणि अभ्यासकांनाही तो वाचायला आणि समजायला अवघड रूपात असतो. अर्थसंकल्प म्हणजे येत्या वर्षात महानगरपालिका काय करणार याचा जाहीरनामाच असतो. आणि म्हणून तो सहज समजेल अशा सोप्या भाषेत आणि सुटसुटीत रुपात असणे आवश्यक आहे.

हीच गरज लक्षात घेऊन गेली पाच वर्षे पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन या आमच्या अभ्यास गटातर्फे आम्ही पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सोप्या आणि सुटसुटीत रूपात सादर करतो आहोत. यंदाचे या उपक्रमाचे सहावे वर्ष आहे.

**policyresearch.in**

या संकेतस्थळावर हे सोपे रूप बघण्यासाठी एका क्लिकवर उपलब्ध आहे. उत्पन्न आणि खर्चाचे तपशील इथे तक्त्याच्या स्वरूपात दिसतात आणि त्यातील प्रत्येक तपशीलवार क्लिक करून अधिक खोलात जाऊन माहिती बघता येते. अशाप्रकारे नागरिकांना आपल्या शहराच्या अर्थसंकल्पाचा वरवर आणि ढोबळ अंदाज तर घेता येतोच, पण सोबतच एका क्लिकवर खोलवर जाऊन तपशीलही बघता येतात. पुणे महानगरपालिकेच्या या अर्थसंकल्पातील काही लक्षवेधी देखील संकेतस्थळावर बघता येतील.

PRO च्या धोरणानुसार सर्व माहिती इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत बघता येते.

### प्रकल्प राबवताना आलेल्या अडचणी आणि निरीक्षणे

१. अभ्यासासाठी अर्थसंकल्पाची MS Excel स्वरूपातली फाईल मिळणे आवश्यक असते. यंदा प्रथमच महापालिकेचा अर्थसंकल्प सादर झाल्यावर अगदी काही दिवसातच ही फाईल उपलब्ध करून दिली गेली. याबद्दल महापालिकेच्या लेखा विभागाचे कौतुक आहे. मात्र ही MS Excel फाईल महापालिकेच्या वेबसाईटवरच अर्थसंकल्प मंजुरीच्या दिवशीच सर्वांसाठी खुली असावी ही दरवर्षीची मागणी यंदाही पूर्ण झालेली नाही.
२. वास्तविक MS Excel पेक्षाही अत्याधुनिक अशा SAP प्रणालीचा वापर करण्यासाठी पालिकेने आठ कोटी रुपये खर्च केले आहेत. त्या प्रणालीचा वापर केल्यास अभ्यासकांना माहिती देणे तर सुलभ होईलच पण पालिकेचा

 Registered address: A16 Venkatesh Complex, Panand Road, Karvenagar, Pune 411052

policyresearch.in
contact@policyresearch.in
+91 8007971692/ +91 9823431138
@policyresearch.in
@policy.research
@PRO_thinktank



आर्थिक कारभारही अधिक गतिमान आणि कार्यक्षम होऊ शकेल. पण अर्थसंकल्प बनवण्यासाठीही या प्रणालीचा वापर झालेला दिसून येत नाही.

३. महापालिकेच्या वित्त आणि लेखा विभागाने स्वतःहून सक्रियपणे पारदर्शक कारभाराकडे पावले टाकली तर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा अधिक तपशीलांत आणि नेमका अभ्यास करणे अभ्यासकांना शक्य होईल आणि त्यातून अनेक चांगल्या गोष्टी समोर येऊ शकतात.

सामाजिक-राजकीय कार्यकर्ते, नागरी संघटना, सत्तेतले आणि विरोधातले लोकप्रतिनिधी, पत्रकार, अभ्यासक आणि अर्थातच सामान्य नागरिक या सर्वांना दरवर्षीप्रमाणेच यंदाही क्लिष्ट अर्थसंकल्पाचे हे सोपे रूप उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

या उपक्रमाला आपण आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रसिद्धी द्यावी ही नम्र विनंती. तसेच बातमीमध्ये संकेतस्थळाची लिंक दिल्यास नागरिकांना ते सोयीचे जाईल.

**डॉ सायली जोग**
मार्गदर्शक आणि प्रमुख अभ्यासक

**मनोज जोशी**
प्रमुख माहिती संकलक आणि विश्लेषक

**नेहा महाजन**
संचालक, PRO

**तन्मय कानिटकर**
अध्यक्ष, PRO